दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## अमेरिकेशिवाय जगातील सर्व काही नष्ट होईल, डोनाल्ड ट्रम्प यांचे विधान

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मागच्या काही महिन्यांपासून सातत्याने कोणत्या न कोणत्या मुद्यांवरून चर्चेत असतात. खरं तर ट्रम्प यांच्या व्यापार धोरणाचा जगातील अनेक देशांना मोठा आर्थिक फटका बसत असल्याची परिस्थिती पाहायला मिळत आहे. ट्रम्प हे सातत्याने भारतावर देखील टीका करत आहेत. ट्रम्प कायम जगावर आपला दबाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. असं असताना आता डोनाल्ड ट्रम्प यांचं एक विधान चांगलंच चर्चेत आलं आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या आर्थिक आणि जागतिक प्रभावाबद्दल एक मोठा दावा केला आहे. 'अमेरिकेशिवाय जगातील सर्व काही नष्ट होईल', असं वक्तव्य डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी ओव्हल ऑफिसमध्ये पत्रकारांशी बोलताना केलं आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाच्या आर्थिक आणि जागतिक प्रभावाबद्दल अनेक मोठे दावे केले. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या पहिल्या कार्यकाळात अमेरिकन अर्थव्यवस्थेच्या वाढीवरही सविस्तर भाष्य केलं. ट्रम्प यांनी म्हटलं की, 'मी पहिल्या चार वर्षांत अर्थव्यवस्था खूप मोठी केली. परंतु नंतर बायडेन प्रशासनाने जे केलं त्यामुळे अर्थव्यवस्था बिघडू लागली.'


(वर्ष ६४ वे अंक २२१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.०४ सप्टेंबर २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# सरकारने काढलेल्या जीआरनंतर ओबीसी नेते, संघटना आक्रमक

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी पुकारलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा जीआर पारीत केला. हैदराबाद गॅझेट प्रमाणे ओबीसी प्रवर्गात मराठा, कुणबी मराठा, मराठा कुणबी अशा प्रकारचे ओबीसी जात प्रमाणपत्र नोंदी तपासून दिले जातील. अशा प्रकारचा जीआर काल काढल्यानंतर मराठा समाजाचे आंदोलन संपुष्टात आले. त्याचे तीव्र पडसाद आज ओबीसी समाजात दिसून आले. सरकारने काढलेल्या या जीआर विरोधात राज्यातील विविध शहरात ओबीसी समाजातील नेते, कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. अनेक ठिकाणी सरकारने काढलेल्या काढलेल्या जीआरची होळी करण्यात आली तर काही ठिकाणी हा जीआर पायदळी तुडवण्यात आला. ओबीसीच्या आरक्षणात मराठा समाजाला घुसविण्याचा डाव हानुन पाडण्यासाठी सरकारी कृत्या विरोधात न्यायालयात जाण्याची भूमिका ओबीसी नेते संघटना यांनी घेत आज आक्रमकता दाखवुन दिली आहे.

कुणबी प्रमाणपत्र वाटपाच्या जीआरवर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. अनेक ठिकाणी या शासन निर्णयाची होळी करण्यात आली. आता याबाबत मंत्री छगन भुजबळ यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे.

मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, मराठा आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र शासनाने एक जीआर जाहीर केला आहे. या शासन निर्णयात काही वाक्ये, शब्द याबद्दल संभ्रम आहे. याचे वेगवेगळे अर्थ लावून ओबीसी आणि मागासवर्गातील अनेक संघटना, नेते यांनी राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले, काही ठिकाणी मोर्चे काढले जातायेत. काही ठिकाणी शासन निर्णय फाडले जातायेत. मी इतर ओबीसी नेत्यांशी चर्चा करत आहे. सध्या राज्यात गणेशोत्सव सुरू आहे. अनेकांच्या घरी गणपती असतात, कार्यकर्ते गणेशोत्सवात आहेत. ओबीसी कार्यकर्त्यांची उपोषणे सुरू आहेत, मात्र तूर्तास ती थांबवावीत असं त्यांनी सांगितले.

तसेच आम्ही अनेक कायदेतज्ज्ञ, वकील यांना ही कागदपत्रे देऊन याबाबत जो काही संभ्रम आहे त्याबद्दल त्यांची मते जाणून घेत आहोत. आवश्यक असल्यास निश्चितपणे त्यांच्याशी चर्चा करून कदाचित सोमवारी, मंगळवारपर्यंत हायकोर्टात जाण्याची आमची तयारी आहे. त्याबाबत अनेक कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागत आहे. आम्ही सगळे विविध कायदेतज्ज्ञांशी चर्चा करत आहोत अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली.

ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी मराठा आरक्षणाच्या जीआरमुळे ओबीसी समाजावर अन्याय झाल्याचा आरोप केला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे छगन भुजबळ नाराज झालेत. सरकारने मराठा समाजाला ओबीसींच्या ताटातले आरक्षण दिले आहे. त्याला आमचा विरोध आहे. आम्ही या प्रकरणी राज्यव्यापी आंदोलन उभारू. याविषयी हैदराबाद गॅझेटियरमध्ये ज्या बाबी नोंद आहेत, त्यावरही आमचा आक्षेप आहे. आता आम्ही याविषयी कायदेशीर लढाई लढू. ओबीसी समाज हा राज्यातील सर्वात मोठा समाज आहे. त्यावर अन्याय होता कामा नये, असे ते म्हणालेत.

### अंतरवालीत जीआरची होळी करत शासनाचा निषेध

जालना दि.३ (प्रतिनिधी)- अंतरवाली सराटीत सुरू असलेल्या उपोषण ठिकाणी ओबीसी आंदोलकांनी या जीआरची होळी करत शासनाचा निषेध नोंदवला आहे. 'हा जीआर आमच्या पाठीत खंजीर खुपसणारा आहे,' असे आंदोलकांनी म्हटले असून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळू नये या मागणीसाठी जरांगे-पाटील यांच्या उपोषणस्थळीच ओबीसी समाजाने आंदोलन सुरू केले आहे. अंतरवाली सराटीमधील सोनियानगरमध्ये सुरू असलेल्या ओबीसी बांधवांच्या उपोषणाचा आजचा तिसरा दिवस आहे. उपोषणस्थळी शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआरची होळी ओबीसी बांधवांकडून करण्यात आली.

ओबीसींचा घात करण्याचं काम या महाराष्ट्र सरकारने शब्दछळ करून सगेसोयरे लागू करण्याच्या जीआरमधून केला आहे. झोपेत धोंडा घालण्याचं काम मुख्यमंत्री यांनी केल्याने या जीआरचा निषेध करत आम्ही त्याची होळी केली. आमचा जीव गेला तरी चालेल, पण आम्ही आमच्या लेकरांबाळाच्या आरक्षणाचे संरक्षण करणार असल्याचे ओबीसी आंदोलक विठ्ठल तळेकर यांनी सांगितले. तसेच आता अंतरवाली सराटीतून ओबीसी आरक्षण संरक्षणासाठी सर्वात तीव्र आंदोलन करू, असा इशारा देखील तळेकर यांनी दिला.

## हा महाराष्ट्र मराठी माणसाचा नव्हे तर फक्त मराठ्यांचा राहिलाय; लक्ष्मण हाकेंची टीका



पुणे दि.३ (प्रतिनिधी)- राज्य सरकारच्या या निर्णयावर ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनी संताप व्यक्त केला. त्यांनी म्हटले की, महाराष्ट्र हा १३-१४ कोटी लोकांचा आणि वेगवेगळ्या जात समूहांचा राहिलेला नाही. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांना, आमदारांना आणि खासदारांना फक्त मराठाच मतदान करतात, असे वाटते. हे राज्य मराठी माणसांचं नाही तर फक्त मराठ्यांचं आहे, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली. ते बुधवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

राज्य सरकारने काल जो जीआर काढला तो बेकायदेशीर आणि संविधानविरोधी आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी पायघड्या घातल्या. त्यांना पाठिंबा द्यायला आमची हरकत नाही. पण ओबीसींच्या आरक्षणाचा काय, याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट करावी, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले.ओबीसीचा आता लढा सुरु होणार, छगन भुजबळ साहेबांच्या लढाऊ वृत्तीचे अभिनंदन करणार आहे. भुजबळ साहेबांनी मोठा लढा उभा केला आहे. आज गोपीनाथ मुंडे यांची आठवण येत आहे. ओबीसी आरक्षणावर सत्तेतील ना विरोधक नेते बोललेत. इथल्या नेत्यांना फक्त मराठा समाज दिसतोय. राज्यातील ओबीसी आरक्षण संपले आहे. जीआर आम्हाला जेवढं समजतो त्यानुसार ओबीसी आरक्षण संपले आहे. तायवडे साहेबांना जीआर समजला नाही, असं वाटतंय. पुढच्या दरवाज्यातून मराठा समाजाला आरक्षण मिळतं नाही म्हणून मागच्या दरवाज्यातून आरक्षण देण्याचा प्रयत्न आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांना जास्त समजतं का? सोशल जस्टीस त्यांना समजतं का? कारखानदरांचे नेते व्हायचं आहे त्यांना, लाज वाटली पाहिजे त्यांना असं वक्तव्य करताना तुम्हाला असा जीआर काढण्याचा अधिकार कुणी दिला,त्यांनी आम्हांला शहाणपणा शिकवू नये. ओबीसींची संघर्ष यात्रा सुरु करणार,मराठवाड्यातून आरक्षण यात्रा सुरु करणार. ओबीसी समाजाने या यात्रेत सहभागी व्हायला पाहिजे, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले.

## मी मराठा आरक्षण रद्द करण्यासाठी कोर्टात जाणार; सदावर्तेंनी शड्डू ठोकला



मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानातील आंदोलनाची सांगता झाली असून राज्य शासनाने मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्या आहेत. त्यानुसार, सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा शासन आदेश जारी केला असून सातारा गॅझेटियरचा शासन आदेश देखील निघणार आहे. त्यामुळे, मराठा आंदोलकांनी गुलाल उधळत जल्लोष केला. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील शासनाच्या या निर्णयाचे स्वागत करत मराठा समाज बांधवांसाठी आजचा दिवस आनंदाचा असल्याचं म्हटले. मात्र, आता या शासन निर्णयावरुन आता ओबीसी समाज आक्रमक झाला असून अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांनीही हा शासन आदेश संविधानाला धरुन नसल्याचे म्हटले. तसेच, शासनाने मनोज जरांगे पाटील यांना आईस गोळा दिल्याचं म्हटलं आहे.

मराठा आरक्षणसंदर्भात शासनाने काढलेल्या शासन निर्णयाविरुद्ध आपण राधाकृष्ण विखे पाटील आणि उपसमितीला कोर्टात बोलवा म्हणणार आहोत. एकदा आरक्षण दिले, तरी पुन्हा आरक्षण दिले हे कोणत्या आधारे? मग १० टक्के आरक्षण रद्द करणार आहात (पान ४ वर)

## मराठा आरक्षण जीआरचा टाचणी एवढाही फायदा नाही-विनोद पाटील

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करत त्यानुसार जीआर देखील काढण्यात आला आहे. परंतु, या जीआरचा टाचणी एवढाही फायदा किंवा उपयोग होणार नसून समाजाला यातून काहीही मिळणार नसल्याची टीका मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केली आहे. यावर मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनानंतर, महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन आरक्षणाचा लाभ देण्यासाठी एक शासन निर्णय जारी केला. मात्र, मराठा आरक्षण याचिकाकर्ते आणि कार्यकर्ते विनोद पाटील यांनी या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. विनोद पाटील यांच्या मते, हा शासन निर्णय नसून, केवळ एक माहिती पुस्तिका आहे. त्यामुळे, या जीआरमुळे मराठा समाजाला कोणताही फायदा होणार नाही, असा दावाही त्यांनी केला आहे.

## मुंबईत झालेल्या नुकसान भरपाईचे काय?

### उच्च न्यायालयाची जरांगे आणि आयोजकांना विचारणा

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची मागणी राज्य सरकारने मान्य केली. त्यानंतर, जरांगे यांनी पाच दिवसांपासून आझाद मैदानात केलेले आमरण उपोषण सोडले आणि आंदोलनही संपले. हे सगळे असले तरी पाच दिवसांच्या आंदोलनदरम्यान मुंबईत सार्वजनिक मालमत्तेच्या झालेल्या नुकसान भरपाईचे काय ? अशी विचारणा करून त्याबाबत प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांना दिले.

जरांगे यांनी चिथावणी दिल्याने मोठ्या प्रमाणात आंदोलक मुंबईत दाखल झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे, याबाबतही जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने नमूद केले. त्यावर जरांगे यांनी अशा प्रकारची कोणतीही भाषणे केलेली नाहीत. किंबहुना, आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून ते उपोषणाला बसले होते, असा दावा करून जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी आरोपांचे (पान ४ वर)

## सरकारच्या जीआरमध्ये नवं काहीच नाही, असीम सरोदेंचं वक्तव्य

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयाचा मराठ्यांना काहीच फायदा होणार नाही, असा दावा अनेकांकडून केला जात आहे. त्यामुळे मराठे युद्धात जिंकले आणि तहात हरले, अशा प्रतिक्रिया समाजमाध्यमांवर उमटत आहे. यावर आता वकील असीम सरोदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, 'सरकारच्या नवीन अधिसूचनेत नवीन काहीच नाही.'

वकील असीम सरोदे म्हणाले, 'काल हैदराबाद गॅझेटियरच्या भरवशावर जीआर काढण्यात आला. ते गॅझेटियर निजामाच्या काळात तयार झालं होतं. त्या गॅझेटियरचा अभ्यास करून मराठा समाजाची मराठवाड्यातील लोकसंख्या समजते. याला यापूर्वीच सरकारने स्वीकृती दिली होती. त्यामुळे सरकारने काढलेल्या नवीन जीआरमध्ये नवं असं काहीच नाही असे असीम सरोदे यांनी म्हटले आहे.

# सरकारकडून ओबीसींसाठी उपसमिती गठीत

### चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्ष, भुजबळ, पंकजा मुंडे, सावे यांचा सदस्यामध्ये समावेश

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी मोठा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकार आता ओबीसींसाठीही महत्त्वाचं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. ओबीसींच्या विकासासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात येणार असून चंद्रशेखर बावनकुळे त्याचे अध्यक्ष असतील. या उपसमितीत छगन भुजबळ, पंकजा मुंडे यांच्यासह एकूण आठ मंत्री असणार आहेत.

राज्य सरकारने नुकतेच मराठा आरक्षणासंबंधी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याविरोधात ओबीसी नेत्यांनी आवाज उठवला. राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी तर मंत्रिमंडळाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यानंतर आता ओबीसींसाठीही उपसमितीच्या माध्यमातून विकासात्मक निर्णय घेण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे. ओबीसींच्या विकासासाठी ही उपसमिती गठीत करण्यात येणार असून त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीबाबत कार्यक्रम आखले जाणार आहेत. तसेच ओबीसांच्या योजनांबाबत ही समिती कामकाज पाहणार आहे.

या समितीचे अध्यक्षपद हे भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे असणार आहे.

तर या समितीत भाजपचे चार, राष्ट्रवादीचे दोन आणि शिवसेनेचे दोन मंत्री असणार आहेत. यामध्ये छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे हे समितीचे सदस्य असतील.

## चंद्रपूरमध्ये मतदार यादीत एका बापाला ५६ मुले दाखवली; विजय वडेट्टीवारांचा हल्लाबोल

नागपूर दि.३ (प्रतिनिधी)- काँग्रेसच्या वतीने मत चोरीच्या मुद्द्यावरून 'वोट चोर, गद्दी छोड' या अभियानाला प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात कामठी येथून सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी राज्यातील मतदार याद्यांमधील गोंधळ, मत चोरीवरून काँग्रेस नेत्यांनी तीव्र हल्लाबोल केला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपने एका बापाला ५६ मुले दाखवून मतदार यादीत घोटाळा केल्याचा आरोप केला. तसेच भाजपने मत चोरी करून १३२ आमदार निवडून आणल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेत मत चोरी आरोप करत खळबळ उडवून दिली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी महाराष्ट्रात कशाप्रकारे मत चोरी झाली, याबाबतचे (पान ४ वर)

## मराठा समाजाने लढाई जिंकली हे यश त्यांचेच, मी नाममात्र-मनोज जरांगे



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाची लढाईत यशस्वीपणे जिंकणाऱ्या मनोज जरांगे यांनी या यशाचे श्रेय गोरगरीब मराठा समाजाला दिली आहे. शेवटी काहीही होवो. माझ्या गरीब मराठ्यांनी जिवाची बाजी लावून अखेर ही लढाई जिंकली. सरकारने आरक्षणासंबंधी काढलेल्या तिन्ही जीआरचे श्रेय मी समाजाला देतो. हे यश त्यांचेच आहे. ते त्यांनीच मिळवले. मी केवळ नाममात्र आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानावरील आपले बेमुदत उपोषण मंगळवारी सायंकाळी मागे घेतले. त्यानंतर सध्या त्यांच्यावर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या लढ्याचे यशाचे श्रेय त्यांनी मराठा समाजाला दिले. ते म्हणाले, शेवटी काहीही होवो, माझ्या गरीब मराठ्यांनी जिवाची बाजी लावून अखेर ही लढाई जिंकली. खूप प्रतिक्षा होती. अनेक शतकांपासून. ती लढायला शेवटी मराठ्यांनी यश आपल्या पदरात पाडून घेतले. म्हणून सर्वात अगोदर (पान ४ वर)

## संजय गांधी निराधार, दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात हजार रुपयांची वाढ

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात एक हजार रुपयांची वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या लाभार्थ्यांना दीड हजार रूपये अर्थसहाय्य दिले जात होते. आता ते अडीच हजार रुपये दिले जाईल.

राज्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत निराधार पुरुष, महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, निराधार विधवा आदींना दरमहा पंधराशे रुपये अर्थसहाय्य दिले जाते. सध्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेत ४ लाख ५० हजार ७०० आणि श्रावणबाळ योजनेत २४ हजार ३ दिव्यांग लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना आता दरमहा अडीच हजार रुपये अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली. हे अनुदान ऑक्टोबर २०२५ पासून देण्यात येईल. यासाठी आवश्यक ५७० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५४ आणि महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

केंद्र सरकारने स्थापन केलेल्या कृती दलाने सुचविलेल्या सुधारणानुसार कारखाने अधिनियम १९४८ मध्ये विविध सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली. राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी हे बदल करण्यात आले आहेत. कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, त्रिपुरा यासारख्या राज्यांनी हे बदल आधीच केलेले आहेत.

या सुधारणांमुळे जास्त मागणी असलेल्या वेळेस किंवा कामगारांच्या कमतरतेमध्ये कोणत्याही व्यत्ययाशिवाय उद्योगांचे कामकाज चालू राहू शकते. कामगारांना योग्य वेतन संरक्षणासह कायदेशीररित्या अतिरिक्त उत्पन्न मिळेल. कायदेशीर अतिकालिक (ओव्हरटाईम) मर्यादा वाढवून कामगारांना मोबदल्याशिवाय अतिरिक्त काम करण्यास सांगितले जाते, यापासून संरक्षण मिळेल. आता ओव्हरटाईम न देता कामगारांकडून काम करवून घेण्याच्या प्रकाराला आळा (पान ४ वर)

# लाल माती आणि गणपती!

कोकणातील गणेशोत्सव म्हणजे दिवाळीपूर्वीची दिवाळी. लाल मातीतल्या संस्कृतीचा विशेष सण. जुन्या घरांना कात टाकायला लावणारा, दूर गेलेल्यांना सांधून घेणारा, भजनांच्या नादाने रात्र जागवणारा, गुणांना आपल्यात सामावून घेणारा, आनंदाची पेरणी करणारा, जुन्यांकडून नव्यांकडे संस्कृतीचा वारसा नकळत सोपवणारा असा सण म्हणजे गणेशोत्सव. असं काय आहे या देवतेमध्ये, ज्याच्या ओढीने कोकणवासीयांचा काफिला मिळेल त्या मार्गाने कोकणात पोहोचू पाहतो?

गणपतीविषयी आकर्षण, तर आबालवृद्ध सर्वांनाच असते तरीदेखील कोकणातला गणेशोत्सव कोणत्या अनामिक शक्तीने कोकणाबाहेर असलेल्या नोकरदार वर्गाला बोलावतो, हा कुतूहलाचा भाग आहे. कोकणी माणसाला जसं त्याच्या लाल मातीचं आकर्षण तसंच गणपतीचंही!

'गणांचा अधिपती तो गणपती' ह्या धारणेनुसार रूद्राला 'गणपती' म्हटलं गेलं आहे तसंच प्राचीन काळच्या गणराज्यांच्या प्रमुखालाही हे नाव दिलं गेलं होतं. असं असलं तरीही आज आपण ज्याला गजवदन म्हणून संबोधतो त्या गणपतीचे मूळ रूप गजमुखी नव्हते. ते मूळ रूप यक्ष संस्कृतीमधून आल्याचं तज्ज्ञांनी नोंदवलेलं आहे. दक्षिण कोकणातील संस्कृती अभ्यासताना असं लक्षात येईल की, इथल्या प्राचीन देवतांचा तोंडवळा हा यक्ष, वीर संस्कृतीशी-तंत्रमार्गाशी साम्य सांगणारा आहे. इथे आणखी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, रूद्राला 'व्रातपती' असंही म्हटलं गेलं आहे. तेच नाव गणपतीला अथर्वशीर्षामध्ये मिळालेले दिसते. याच अथर्वशीर्षामधील 'गणानां त्वा गणपतिं हवामहे' ही ऋग्वेदातील ऋचा येते. खरेतर हे आवाहन ऋग्वेदकालीन ब्रह्मणस्पतीला आहे; परंतु ते नंतर गणेशाला करण्यात आल्याचं दिसतं. गणपतीला अनेक नावं ही तंत्रधर्माने दिली आहेत. गणपती हा साचेबद्ध देहापलीकडचा, 'गं' या तांत्रिक शरीराचा, बीजमंत्राचा देव आहे. विघ्न आणणारा याअर्थी 'विघ्नकर्त्या' विनायकाची शांती करणारे मंत्र याज्ञवल्क्यसूत्रात तसेच बौधायन सूत्रात सांगितलेले असून त्या अनुसार हा एक दुष्ट ग्रह आहे. तेव्हा 'त्याला विघ्न न आणता इथून दूर निघून जा,' असे मंत्रोच्चाराद्वारा सांगितले जात असे. ऋग्वेदामध्ये रुद्राला उद्देशून गणपती, गणेश, गणराज म्हटले आहे. हीच नावे पुढे गणपतीलाही मिळाल्याचे दिसते. वेदकालीन रुद्राचा शिवापर्यंतचा अर्थात रौद्र ते मंगल, शुभंकर प्रवासाप्रमाणेच संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणपतीचाही प्रवास आहे. विघ्नकर्ता ते विघ्नहर्ता हे त्याचे शुभदायक स्वरूप समाजामध्ये रुळले ते इसवी सनाच्या चौथ्या ते सहाव्या शतकाच्या उत्तरार्धादरम्यान अर्थात गुप्त काळापासून. या देवतांच्या स्वरूपामध्ये कालौघात बदल घडले असले तरीही त्यांच्यातील मूळ बीज कायम राहिलेले आढळून येते. रूद्र, शिव आणि गणपती यांच्यामध्ये जसे नावांचे, विशेषणांचे साम्य आहे तसेच साम्य त्यांनी धारण केलेल्या आभूषणांमध्ये, वाहनांमध्येही आहे. रूद्र हा मरूतब गणांचा अधिपती तर शिव हा गणांचा अधिपती म्हटला जातो. गणपती हादेखील नंतर शिवगणांचा प्रमुख म्हणूनच सामोरा येतो. शिव गजचर्म धारण करतो, तर गणेश हा गजमुख आहे. रूद्र आणि गणपतीला तत्पुरुष, वक्रतुण्ड, दन्ती ही समान विशेषणे तर गणेश आणि शिव यांच्यातील साम्य वैशिष्ट्यांमध्ये त्रिनेत्र, भालचंद्र, नागभूषण दिसून येतात. अथर्वशीर्षामध्ये तर गणपतीला 'त्वं ब्रह्मास्त्वंविष्णू त्वंरूद्रः' असे म्हटले आहे. विश्वाचे सर्वस्व केवळ गणपती असल्याचा तत्त्वतः अर्थ त्यातून निघतो. गणेशजन्माच्या कथा वेगवेगळ्या असल्या तरीही त्यातून एक सामायिक धागा मिळतो तो म्हणजे ही देवता अयोनिज आहे. ब्रह्मवैवर्त पुराण, शिवपुराण हेच सांगते. शिवपरिवारातील देवता म्हणून गणपतीला स्थान मिळाल्यानंतर शिवाची जी आभूषणे आहेत ती स्वाभाविकपणे गणपतीच्याही अंगाखांद्यावर रुळताना दिसतात. त्यात कमरेभोवतीचा नागबंध, भालचंद्र आणि त्रिनेत्र ही प्रमुख आहेत. खरेतर गणपतीचे वाहन उंदीर कसे असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्याचेही उत्तर आपल्याला तैत्तरिय संहितेमध्ये सापडते. तिथे उंदीर हे रुद्राचे वाहन म्हणून सांगितले आहे. थोडक्यात, शिव, रूद्र आणि गणपती या देवतांचे स्वरूप, आभूषणे, वैशिष्ट्ये यांवरून सद्यकाळात पूजल्या जार्णाया गणेशरूपाचे सम्मिलित रूप साकारलेले दिसून येते.

गणपती हा अथर्वशीर्षामध्येच नव्हे तर पहिल्यापासूनच एकदन्त, चर्तुहस्त असा वर्णिलेला, अंकित केलेला आहे. त्याच्या वेगवेगळ्या रूपांनुसार त्याच्या ध्यानाचे, पूजेचे विधी-परंपरा बदललेल्या दिसतात. तांत्रिक देवता म्हणून उल्लेख होर्णाया गणपतीचे वाहन सिंह दाखविण्यात आले आहे आणि त्याचे दाखले काश्मीर, नेपाळ, अफगाणिस्तानातील गणेशमूर्तींतून मिळतात. 'गणांचा गणपती, व्रातांचा व्रातपती, विरूपांचा विरूप अशा सर्वांचा वैदिक ब्रह्मणस्पतीमध्ये समावेश होऊन गणेशाचे आजचे विशाल रूप झाले असले पाहिजे, असे मत पु. रा. बेहेरे यांनी गणपतीच्या विघ्नकर्ता ते विघ्नहर्ता या स्वरूपाविषयी प्रतिपादित केलेले आहे. तर गणपतीची लोकप्रियता लक्षात घेता गुप्तकाळात राज्यकर्त्यांनी या देवतेला नंतर विघ्नहर्ता रूपात स्वीकारल्याचे प्रतिपादन पां. वा. काणे यांनी केले आहे.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रामध्ये रूद्राला 'गणराज' असे संबोधित केलेले आहे. शिवाचे तांडवनृत्य, नटराज स्वरूप आणि शिवपरिवारातील देवता म्हणून गणपतीलाही ओघाने 'गणराज' हे नामाभिधान मिळाल्याचे, त्याचेच प्रतिबिंब काव्यात 'गणराज रंगी नाचतो' यातून आपल्याला दिसून येईल; किंबहुना याच वैशिष्ट्यामुळे गणपतीला 'चौसष्ट कलांचा अधिपती'ही म्हटले गेले आहे. प्राचीन टोळ्यांमध्ये अशा प्रकारे प्राण्यांचे मुखवटे नृत्यामध्ये वापरले जात होते, असा संदर्भ सापडतो. नंतरच्या काळातील गणपतीच्या आरतीमधील 'शेंदूर लाल चढायो'चा संबंध असाही कदाचित जोडता येऊ शकतो. रक्तवर्ण कमळे, लाल जास्वंद गणपतीला आवडण्यामागेही प्राचीन प्रथा, कथा, विधी आहेतच. आरंभीच्या काळात गणपती हा अवैदिकांचा देव म्हणून येताना त्याचा रक्तवर्ण अवैदिक प्रथांशी जोडलेला आहे. लालरंग तर कोकणचा आणि इथल्या मातीचाही गुणविशेष. बहुधा म्हणूनच लालमातीमध्ये फुलणारी इथली जास्वंद अंमळ जास्तच लाल असते. कदाचित माती आणि देवता असा दोहोंच्या गुणवैशिष्ट्यांचे सायुज्य कोकणी माणसाला या गणरायात दिसत असावे का, हा विचार तर्कसंगत ठरतो. आपण संस्कृतीबंधच्या पहिल्या काही भागांमध्ये या लालमातीचा इथल्या भूगर्भशास्त्राशी असलेला संबंध पाहिला होता आणि त्याचा पिकांवर होणारा परिणामही अभ्यासला होता. त्यामुळे गणपतीच्या आकर्षणासंदर्भात पडलेला हा प्रश्न वरवर साधा वाटत असला तरी त्याच्या उत्तराचा तार्किक शोध मात्र असाधारण ठरतो!

# मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था - सारथी

राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २०१९ पासून 'सारथी' ही संस्था सुरू केली आहे. मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था म्हणून 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' या बोधवाक्याखाली छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत ६३ विविध उपक्रम राबवत आहे.

सारथी संस्थेमधील सन २०२१-२२ ते २०२४-२५ एकूण चार वर्षांमध्ये ८ लाख ३८ हजार ४७७ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी या संस्थेमार्फत मार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सारथी संस्थेमधील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवडून येण्याचा नवीन उच्चांक निर्माण करत आहेत.

### शैक्षणिक संधी व शिष्यवृत्ती योजना

सारथी मार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. सारथीच्या स्थापनेपासून २०२० ते २०२४ या कालावधीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षेमध्ये ११२ विद्यार्थी निवडून शासनामध्ये सेवा बजावत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये २०२० ते २०२३ या कालावधीत १०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून वर्ग एक मध्ये २२९ तर वर्ग दोन मध्ये ८१९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

### कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

सारथी मार्फत राबविण्यात येणारा छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुकास्तरावर राबवण्यात येतो. या योजनेमध्ये कालानुरूप विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एक लाख २० हजार लाभार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार होते, त्यापैकी ९७ हजार २८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ३४ हजार ३०४ लाभार्थ्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी ७३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली असून ९४१८ लाभार्थ्यांची मुलाखत प्रक्रिया सुरू आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये १७ हजार २५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टूल रूम कौशल्य प्रशिक्षण उपक्रम या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त १०१२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी लागली आहे.

### परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना आज अखेर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०२५ करिता ७५ जागांसाठी दिनांक १६ जून २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते, यामध्ये निवड प्रक्रिया सुरू आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती

देशातील नामवंत २०० विद्यापीठात शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये शिक्षण शुल्क, लायब्ररी शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये या योजनेअंतर्गत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन पाच कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेसाठी २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

### उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना

वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (IFAT) आणि Wine Brewing and Alcohol Technology (WBAT) विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. IFAT मधील एकूण ८० विद्यार्थ्यांना ४९.४० लाख व WBAT मधील एकूण २८ विद्यार्थ्यांना ३४.५४ लाख रूपये शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आले. यापैकी २०२२-२३ मधील पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण सात विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

सेनापती धनाजी जाधव सारथी शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण योजनेमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये ३३० शेतकऱ्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकरी मावळा सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी ५०० असून २०२५ पासून हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. पशुधन संगोपन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्षभरात एक हजार लाभार्थ्यांना उरळी कांचन येथील बायफ या संस्थेमार्फत ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण, ६० दिवसीय प्रक्षेत्रिय प्रशिक्षण ८९ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

### कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम पुणे, वाशिम, कोल्हापूर, गडचिरोली, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, नागपूर, नाशिक, पालघर, बीड, रत्नागिरी या जिल्ह्यात राबवला जातो. या सर्व जिल्ह्यांत एकूण १४१९ अभ्यासक्रम राबविले जात असून त्यापैकी ९८९ अभ्यासक्रम पूर्ण झालेले आहेत. सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आय.डी.टी.आर. भोसरी पुणे येथे हलकी व जड वाहने चालवण्याचे ३० दिवसाचा प्रशिक्षण देण्यात येते. सन २०२५ मध्ये या प्रशिक्षणास सुरुवात झाली असून आत्तापर्यंत ४९ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण योजनेअंतर्गत २६० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय करियर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरामध्ये सन २०२२ पासून ते २०२५ मध्ये १९ हजार १९१ विद्यार्थ्यांनी करिअर मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे.

### निबंध स्पर्धांचे आयोजन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा योजनेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी विद्यार्थी व इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत तीन लाख १६ हजार ५९२ इतके विद्यार्थी सहभागी झाले असून त्यापैकी ९४४४ इतक्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले आहे. या स्पर्धांसाठी १७ लाख ९३ हजार रुपयांची पारितोषिक ठेवण्यात आली होती.

### छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळिवण्याच्या दृष्टीकोनातून ही योजना राबविली जाते. छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत ३०७८ विद्यार्थी योजनेसाठी पात्र होते. त्यापैकी ३९४ विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून १०३ विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास कार्यक्रम

सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत इनक्युबेशन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून स्टार्टअप कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक साहाय्य दिले जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य यादी पैकी १३ इनक्युबेशन केंद्राने सारथी संस्थेबाबत सामंजस्य करार केला आहे. सारथीमार्फत लाभार्थ्यांना एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. सन २०२५ या वर्षी १२० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

### सर्व सोयी-सुविधायुक्त छत्रपती शिवाजी महाराज संकुल

सारथी संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना प्राधान्याने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज संकुल उभारण्यात येत आहेत. या इमारत बांधकामासाठी शासनाने मोफत जमिनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. प्रत्येक संकुलामध्ये ५०० मुलांचे वसतीगृह, ५०० मुलींचे वसतीगृह, ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, सारथी विभागीय कार्यालयांचा समावेश आहे. सारथीच्या पुणे येथील मुख्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून नवीन इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरू झाले आहे. इतर विभागीय कार्यालयाची कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर ती पूर्ण करण्यात येत आहेत. विभागीय कार्यालय पुणे, सारथी उपकेंद्र कोल्हापूर, विभागीय कार्यालय खारघर नवी मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, सारथी उपकेंद्र लातूर, विभागीय कार्यालय नागपूर, अमरावती यासाठी आठ जिल्ह्यात वसतिगृह, अभ्यासिका, कौशल्य विकास केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

### सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना

सारथी मार्फत सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना राबवण्यात येत असून यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळातील प्रकाशित कागदपत्र, आदेश, हुकूमनामा इत्यादी दस्तऐवज पुराभिलेख संचालनालयाकडून डिजिटल स्वरूपात प्राप्त केले आहेत. या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या विषयावर पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. सारथी संस्थेमार्फत शिवराज्याभिषेक अभियान, किल्ले संवर्धन, वृक्षारोपण, जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये पीएचडी करणाऱ्या १०८६ विद्यार्थ्यांनी एक लाख १८ हजार ८३४ सीड बॉल तर अधिकारी कर्मचारी यांनी १३ हजार ६०० सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल २०२४ मध्ये ७५ किल्ल्यांच्या परिसरात टाकण्यात आले. सरदार शिरोजी इंदलकर सारथी किल्ले संवर्धन अभियानांतर्गत ३८ किल्ले व दोन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांच्या परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ८५८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चावडी वाचन अभियानामध्ये पाच हजार विद्यार्थ्यांद्वारे ग्रामसभांमध्ये योजनांची माहिती प्रसारित करण्यात आली आहे.

मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेमुळे हजारो विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन व शैक्षणिक बळ मिळत आहे. या समाजातील मागास घटकांना सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा व नवयुगाची आव्हाने पेलणारा समाज तयार करण्यामध्ये सारथी मोलाची भूमिका बजावत आहे. योग्य शिक्षण, दिशा आणि संधी मिळाल्यास यश मिळवता येते.

हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम सारथी संस्था करत आहे. मराठा समाजातील गरजू, होतकरू युवक व युवती या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात यश संपादन करत आहेत. मराठा समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन विकासाच्या प्रवाहात अग्रेसर ठेवणारी सारथी नक्कीच या समाजासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**- संध्या गरवारे- खंडारे,**
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# स्वदेशी ॲक्शन, दमदार भावनेने भरलेले आणि पुरेपूर मनोरंजन असणाऱ्या अनुराग कश्यप यांच्या निशानची चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

अमेझॉन एमजीएम स्टुडिओज इंडियाच्या वतीने आज त्यांच्या आगामी, सिनेमागृहात प्रदर्शित होणाऱ्या 'निशानची' या सिनेमाचा दिमाखदार ट्रेलर प्रदर्शित केला. अनुराग कश्यप दिग्दर्शित, हा सर्वोत्कृष्ट देशी मसाला



मनोरंजनपट खऱ्या अर्थाने मोठ्या पडद्यावरील भव्य प्रदर्शनाचे आश्वासन देतो. सिनेप्रेमींना आवडणारे प्रत्येक घटक म्हणजे ॲक्शन, ड्रामा, रोमान्स, कॉमेडी, मां का प्यार आणि फिल्मी समावेश असलेला तगडा ट्रेलर आहे. नवोदित ऐश्वर्य ठाकरेच्या तडफफदार दुहेरी भूमिकेसह, 'निशानची'चे कथानक जुडवा भाई बबलू आणि डबलू यांच्या खिळवून ठेवणारे जीवन उलगडते- या व्यक्ति रेखांच्या आस्थेच्या अगदी विरुद्ध असलेली प्रतिबिंब. या सिनेमाची निर्मिती अजय राय आणि रंजन सिंह यांनी जार पिक्चर्स अंतर्गत, फ्लिप फिल्म्सच्या सहकार्याने केली असून प्रसून मिश्रा, रंजन चंदेल, तसेच अनुराग कश्यप यांनी या सिनेमाची कथा लिहिली आहे. वेदिका पिंटो, मोनिका पंवार, मोहम्मद जीशान अय्यूब, त्याचप्रमाणे कुमुद मिश्रा यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'निशानची' हा सिनेमा १९ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

'निशानची'चा ट्रेलर प्रेक्षकांना २००० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात, थेट उत्तर प्रदेशातील छोट्या शहरातील गजबजलेल्या गल्लीत घेऊन जातो. जिथे बबलू निशानची, रंगीली रिंकू आणि डबलू यांचे जीवन अनपेक्षित मार्गांनी धडकते. थक्क करणारा पाठलाग, शिट्टी-मार संवाद, मातीतला देशी संघर्ष आणि हळुवार प्रेमाच्या कोमल क्षणांसह, हे चुंबकीय कथानक जितके अस्ताव्यस्त आहे तितकेच अस्ताव्यस्त जग रंगवते. हसवणारा धमाल विनोद आणि 'अनफिल्टर्ड देसी स्वॅग'सह हा ट्रेलर बंडखोरी, प्रणय आणि शत्रुत्वाची नाडी समान प्रमाणात हेरतो. थिरकायला लावणाऱ्या तालांनी आणि लार्जर देन लाईफ कथा प्रेक्षकांना त्यांच्या आसनावर खिळवून ठेवते. एक स्फोटक कथा पुढे सरकत जाते; जी उलगडण्याची वाट प्रेक्षक पाहत राहतील.

'निशानची'चे दिग्दर्शक आणि सहलेखक अनुराग कश्यप म्हणाले की , अमेझॉन एमजीएम स्टुडिओज इंडिया' सोबत काम करणे अत्यंत फलदायी ठरले. कारण त्यांनी माझ्यावर पूर्णपणे विश्वास ठेवला. ऐश्वर्य, वेदिका, मोनिका, झिशान, कुमुद आणि या सिनेमातील प्रत्येक कलाकाराने केवळ अभिनयच केला नाही, तर या पात्रांसोबत जगले आणि श्वास घेतला. कथेप्रती त्यांची बांधिलकी आणि अभिनयाची सत्यता या कलाकृतीत चमकते. माझ्या टीमने त्या उत्कटतेची जुळवाजुळव फ्रेम-टू-फ्रेम केली आहे. ज्यामुळे सिनेमा इतका चांगला बनला. शिवाय त्याच्या संगीतातदेखील तीच भावना सिनेमातून वाहते आणि कथेत भर घालते. प्रेक्षकांना हे संगीत खरोखरच आवडेल मला याची खात्री वाटते.

# हरिपाळदेव हेच सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी!

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत एकाचवेळी दोन अभ्यासक्रम शिकण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्याकरिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने जळगावचे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्यासमवेत त्रिपक्षीय सामंजस्य करार केला आहे. जळगाव येथे दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या एका विशेष बैठकीत तीनही विद्यापीठांच्या वतीने यासंबंधीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० (एनईपी - २०२०) अंमलबजावणी मध्ये एक महत्वाचे पाऊल पुढे टाकण्यात आले आहे.




यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजय सोनवणे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ, य. च. म. मुक्त विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिह बिसेन, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. य. च. म. मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील व एम. जी. एम. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाने तयार केलेले यासंदर्भातील माहितीपत्रकाचे प्रकाशन मा. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांच्या हस्ते तर विद्यार्थ्यांकरिता अतिशय उपयुक्त अशा 'पोर्टल फॉर टू डिग्री प्रोग्राम सायमंटेनिअसली' या संकेतस्थळाचे उद्घाटन मा. कुलगुरू प्रा. संजय सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. हे पोर्टल क.ब.चौ.उ.म. विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ www.nmu.ac.in यावर उपलब्ध आहे. या करारामुळे तिघा विद्यापीठांच्या लाखो विद्यार्थ्यांना नियमित पदवीचे शिक्षण घेतांना शेती व आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रोन तंत्रज्ञान, औषधीशास्त्र, या सारखे अनेक नवनवीन अभ्यासक्रम शिकता येणार आहेत. विद्यार्थ्यांना यासोबतच नाविन्यपूर्ण शैक्षणिक व अध्ययन संधी, नोकरी - करीअरच्या विस्तृत संधी आणि व्यापक पर्यायाची उपलब्धतता, व्यक्तिमत्व विकास असे विविधांगी फायदे होणार आहेत. याप्रसंगी बोलतांना मा. कुलगुरु प्रा. संजय सोनवणे यांनी सांगितले की सन २०४७ मधील विकसित भारत या अनुषंगाने नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. त्यादृष्टीने आजचा करार हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. विद्यापीठांनी एकमेकांसोबत सहकार्य व संयुक्तपणे काम करून विकसित राष्ट्र घडविणे आवश्यक आहे, असे सांगून आपल्या विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. मा. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांनी बोलताना आगामी काळ हा विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्यांना शिक्षण घेण्यासाठी विद्यापीठांनी तसे अभ्यासक्रम तयार करून देण्याचा असल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने या करारामुळे त्यामुळे विद्यार्थ्यांची गरज पूर्ण होणार आहे, असे सांगत आपल्या विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती दिली. मा. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी काळाची गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांनी रोजगार उपलब्धतेसाठी किमान एक कौशल्य अभ्यासक्रम शिकणे व विद्यापीठांनी आंतर विद्याशाखीय शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. त्या अनुषंगाने दोन नियमित अभ्यासक्रम तासिकांचे वेळापत्रक सकाळ / सायंकाळ अशा सत्रात ठेवून किंवा एक नियमित अभ्यासक्रम आणि एक दूरस्थ अभ्यासक्रम अशी सोय विद्यार्थ्यांना उपलब्ध झाली आहे. त्यात क.ब.चौ.उ.म विद्यापीठ हे अग्रस्थानी असल्याची पुस्ती त्यांनी जोडली.

याप्रसंगी य. च. म. मुक्त विद्यापीठाचे परीक्षानियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्र (सी.आय.क्यू.ए. - सिका) संचालक प्रा. मधुकर शेवाळे, प्रा. हेमंत राजगुरू, एमजीएम विद्यापीठातर्फे आय क्यू. ए. सी. संचालक प्रा. परमिंदर कौर, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्रा. मधुलिका सोनवणे, प्रा. आशुतोष पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क.ब.चौ.उ.म विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी केले. सूत्रसंचलन कुलसचिव डॉ. विनोद पाटील तर आभार आय. क्यू. ए. सी. संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी मानले.

**-महेंद्र बनसोडे,**
जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कक्ष, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

# तंत्रशिक्षणातील प्रवेशांची आकडेवारी (२०२४-२५)

**पदवी : १७ हजार ७७८, पदव्युत्तर १ हजार ९२७, डिप्लोमा ) : ७ हजार ३५४ म्हणजेच एकूण २७ हजार ०५९ विद्यार्थी यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये SEBC आरक्षणाअंतर्गत प्रवेश घेतलेला आहे.**

डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना ही विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३ पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून, उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेअंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते.

विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात.यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF)

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच. डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (CSMNRF) सुरु करण्यात आली आहे. सदर छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३ पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे.आज रोजी पर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची झहऊ पुर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे.या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अधिछात्रवृत्ती :

गठऋ प्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती णऋउ निकषा नुसार ५ लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे.

तसेच SRF प्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती (CSMNJRF) अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर (Award Letter) दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच. डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएच.डी. च्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकुण ५ वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल (Dissertation) सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रक्कमे संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे (UGC) अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२० मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१ मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२ मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत. सन २०२३ मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुलामुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS World Ranking मध्ये २०० च्या आत रॅन्कीग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना' या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३ पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्रतील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत 'डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

देशाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत भारतातील शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात झाली आहे. देशातील एकूण नोंदणी गुणोत्तर (Gross Enrollment Ratio - GER) ५०% पर्यंत नेण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी, भारताने जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन भारतातच उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली आहेत.

महाराष्ट्रातही विविध अभिनव आणि परिवर्तनशील उपक्रम शिक्षण क्षेत्रात राबविले आहेत. यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि विद्यार्थ्यांपर्यंत संधींची समान उपलब्धता आणि संशोधनाला चालना यावर अधिक भर देऊन गुणवत्तापूर्ण शैक्षणिक बदल करून राज्यातील शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख केली जात आहे.

**– काशीबाई थोरात-धायगुडे**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -३२

## वैजापूरात महिला बचत गटाच्या माध्यमातून चार हजार चारशे वृक्ष लावण्याचा व संवर्धन करण्याचा संकल्प




वैजापूर, दि. ३ (प्रतिनिधी) – वैजापूर येथील आकांक्षा महिला बचत गट, तुळजाभवानी महिला बचत गट, भाग्यलक्ष्मी महिला बचत गट, मोना महिला बचत गट, ओम साई महिला बचत गट, हुमेरा महिला बचत गट, या महिला बचत गटाच्या महिलांनी नगर पालिकेच्या खुल्या जागेवर ४४००रोपटी लावून हरित वैजापूर करण्याचा संकल्प केला आहे. याचाच भाग म्हणून बुधवार (ता.०३) रोजी लक्ष्मीनगर, शिवशंकर वसाहतीत पालिकेच्या राखीव जागी सामाजिक कार्यकर्ते, स्वच्छतादूत व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत ५१ वृक्ष हुमेरा महिला बचत गटाच्या महिलांनी लावून ती जगविण्याचा संकल्प केला.

मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत उत्तम बिघोत (राजपूत) यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुनील भाग्यवंत तसेच स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे व सहाय्यक रमेश त्रिभुवन यांच्या सहभागाने 'एक पेड माँ के नाम'या अंतर्गत शहराच्या विविध भागात साडे चार हजार वृक्ष पुढील दोन महिन्यात लावण्यात येणार आहे.१५ऑगस्ट ला आरंभ झालेल्या ह्या उपक्रमात आतापर्यंत ८०१ रोपटी विविध भागात लावण्यात आलेली आहेत. महिला बचत गटाच्या महिला या झाडांना पाणी ही टाकणार आहेत व संरक्षण, संवर्धन साठी जाळी ही लावणार आहेत,व दैनंदिन देखरेख करणार आहेत.

## आंदोलन तर संपले, पण लाखोंच्या संख्येत मुंबईत आलेल्या भाकरी-चटणीचे काय? उरलेले अन्न आणि साहित्य गरजूंना केले दान

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – मराठा आंदोलनादरम्यान राज्याच्या कानाकोपऱ्यातून नवी मुंबईत चटणी-भाकरीच्या शिदोरीचा महापूर आला होता. प्रत्येक गावातून 'एक शिदोरी आंदोलकांसाठी' या भावनेतून नागरिकांनी मदतीचा ओघ सुरू केला. त्यामुळे तीन दिवसांत तब्बल दहा लाख भाकऱ्या, चटणी, ठेचा, लोणचे, भाजी, पाणी व इतर साहित्य जमा झाले. वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात चार ठिकाणी या भाकऱ्या व अन्य साहित्याचा प्रचंड साठा करण्यात आला होता. आलेले अन्न लगेच आंदोलकांना पुरवले जात होते; मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात मदत आल्यानंतर अखेर समाजातर्फे आता मदत थांबवा, असे आवाहन करावे लागले. मंगळवारी संध्याकाळी आंदोलनाची सांगता झाल्यानंतर या उरलेल्या भाकऱ्या, पाण्याच्या बाटल्या, चटणी, ठेचा, लोणचे यासह इतर अन्नपदार्थ वाया जाऊ नयेत म्हणून मराठा आंदोलकांनी ते गरजूंपर्यंत पोहोचवण्याचा निर्णय घेतला.

## खातेअंतर्गत पीएसआय परीक्षेचा मार्ग मोकळा, मिळणार २५ टक्के आरक्षण

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने पीएसआय पदासाठी २५ टक्के आरक्षणासह खातेअंतर्गत विभागीय परीक्षेचा मार्ग पुन्हा एकदा मोकळा केला आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये खातेअंतर्गत परीक्षा बंद करण्यात आली होती, मात्र पुन्हा एकदा या परीक्षेला हिरवा कंदील मिळाला असल्याकारणामुळे, शासनाच्या या निर्णयाने मेहनती आणि अनुभवी पोलीस कर्मचाऱ्यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी लाभणार आहे.

पोलीस कॉन्स्टेबल आणि अधिकाऱ्यांना पोलीस उपनिरीक्षक पदांवर बढतीची नवीन संधी

राज्य सरकारनं पोलीस दलाबाबत मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने पोलीस उपनिरीक्षक पदासाठी खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, राज्यातील पोलीस अंमलदारांना आता पीएसआय होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना कमी वयातच झडख पदावर पदोन्नती मिळेल. तसेच पोलीस दलात तरुण आणि ऊर्जावान अधिकारी दीर्घकाळापर्यंत सेवेत राहू शकतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे हजारो पोलीस कर्मचाऱ्यांच्या करिअरला भरारी मिळणार आहे. साधारणपणे पोलीस कॉन्स्टेबलला प्रमोशनद्वारे PSI पद मिळते. पण ते त्यांच्या सेवाकालाच्या शेवटच्या टप्प्यात मिळते. त्यामुळे त्यांना PSI म्हणून फारतर दोन ते तीन वर्षेच काम करता येत असते. मात्र, विभागीय परीक्षेतून पीएसआय झालेल्या अधिकाऱ्यांना कमी वयातच पदोन्नती मिळणर आहे. जेणेकरून पोलिस अंमलदार तसेच अधिकाऱ्यांना त्यांच्या झडख च्या पदासाठी शेवटच्या सेवांकालची प्रतीक्षा करावी लागणार नाही! दरम्यान गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी पोलीस खातेअंतर्गत विभागीय परीक्षा सुरू करण्याची मागणी केली होती.

**गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याची मागणी**

गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी एप्रिल २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदासाठीची खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करावी अशी मागणी केली होती. पूर्वी किमान पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या पोलीस अंमलदारांना पीएसआय पदासाठी २५ टक्के आरक्षण देण्यात येत होते मात्र फेब्रुवारी २०२२च्या शासन निर्णयानुसार ही परीक्षा बंद करण्यात आली होती. यानंतर योगेश कदम यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून परीक्षा पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान आज अखेर शासनाने आज अधिकृत निर्णय घेतला गेला. पोलीस दलातील मेहनती, कर्तव्यनिष्ठ आणि तरुण पोलीस अंमलदारांना अधिकारी म्हणून पुढे जाण्याची संधी मिळावी यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल असं मंत्री योगेश कदम यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया देताना म्हंटले आहे.

## मॅरेथॉन स्पर्धेबाबत झाला महत्त्वाचा निर्णय

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त १७ सप्टेंबरपासून २ ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत युवकांमध्ये क्रीडाप्रेम जागविण्यासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी देशभरातील ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली. या संदर्भात झालेल्या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत डॉ. मांडविया यांनी राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा विभागाचे सचिव हरिरंजन राव उपस्थित होते. राज्याचे क्रीडा मंत्री अ‍ॅड. माणिकराव कोकाटे यांच्यासह विविध राज्यांचे क्रीडा मंत्रीही उपस्थित होते. मंत्री डॉ. मांडविया म्हणाले की, युवकांचे आरोग्य सक्षम ठेवणे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम जागवणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे या कार्यक्रमांना प्रत्येक राज्याने सक्रिय सहभाग देऊन यशस्वी करावे.

## सुगंध दशमी निमीत्त राजाबजार जैन मंदिरात भगवंताला फुलाची चादर व धुप अर्पण सोहळयास हजारो भाविकांची उपस्थिती

**संयम हेच मनुष्य जीवनाची सार्थकता आ. डॉ. प्रणामसारगजी महाराज**



छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी)- श्री. खडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य डॉ. प्रणामसागरजी महाराज यांचा भक्तांबर प्रभावना चातुर्मास उत्साहात सुरु असुन त्यांच्या सानिध्यात आज सुगंधी दशमी व उत्तम संयम या दिवशी सकाळी भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान शैलेंद्र सेठी यांना मिळाला. तसेच सुगंधी दशमी निमीत्त शांतीधारेचा मान रमनलाल सचिन दर्शन कासलीवाल परिवार नांदगांववाला यांना मिळाला तर सुगंधी दशमी निमीत्त भगवंताला धुप व फुलाची चादर चढविण्याचा मान अभिषेककुमार सौ. शैलाजा तिलोकचंद चुडीवाल परिवार यांना मिळाला. तर हिराकाका प्रांगण येथे धुप चढविण्याचे सौभाग्य महावीरकुमार मिश्रीलाल स्वदेश ठोले यांना मिळाला.

आज सुगंध दशमी निमीत्त. संयम हेच मनुष्य जीवनाची सार्थकता आपल्या गरजा सीमित करणे, मर्यादित ठेवणे, कुठे थांबायचे हे कळणे म्हणजेच संयम होय. संयम, सदाचार व चारित्र्यशिवाय मनुष्य पशुसमान आहे ।चारित्रहीन मनुष्याला योग्य अयोग्या चे ज्ञान होत नाही ।मनुष्य खूप शिकतो परंतु यथार्थ काय आहे हे जाणून घेण्यावर भर देत नाही ।सम्यक दर्शनाबरोबरच त्याने यथार्थ जाणले पाहिजे. असंयमी मनुष्याला अज्ञानी, अशिक्षितच म्हणावे लागेल. संयम एक असा मुकुट आहे तो जगात कधीच कोणासमोर झुकत नाही, त्याचा सर्वत्र आदर होतो. धन, संपत्ती, वैभवचा विनाश झाला तरी नुकसान होत नाही. शारीरिक, मानसिक स्वास्थ्य बिघडले तरी थोडी हानी होते. परंतु चारित्र्य नष्ट झाले तर आपल्या सर्वस्वाचा नाश होतो. म्हणून आपल्यात संयम, अनुशासन असणे खूप गरजेचे आहे. यातूनच चांगले चारित्र घडते.आपले तन, मन,धन, स्वाभिमान सर्व काही देऊन संयम धर्माचे रक्षण करायलाच हवे. कारण तो असा धर्म आहे जो सदा सर्वकाळ आपल्या आत्म्याबरोबरच राहतो. कृतार्थ, सार्थक आणि समाधानी जीवनाकरिता नात्यातील परस्पर विश्वास, लज्जा, स्नेह, सावधानी, आणि समाधान हिच पाच नैतिक बंधने अत्यावश्यक आहेत. आपण जगणार कसे यापेक्षा जगतो कसे याचा विचार करणे गरजेचे आहे. जीवनात संयमाचे रक्षण केले तर निश्चितच जीवनाची मोठी संपत्ती आपण कमावतो. जीवनाच्या सार्थकते बरोबरच आत्मकल्याणासाठी संयम धर्माचे सदैव पालन करून अपरिमित सुखाची उपलब्धी करावी. योग्य वेळी ब्रेक लावला नाही तर गाडीचा अपघात घडतो। त्याचप्रमाणे मानवी जीवनाच्या गाडीला इंद्रियाच्या, मनाच्या आणि वासनाच्या संयमाच्या ब्रेकची गरज आहे. ज्याच्या अंगी संयमाचा गुण असतो समाधान त्याच्याकडे चालत येते. समाधानी व्यक्ती स्वतःच्या जीवनाबरोबरच इतरांचे जीवनही समृद्ध करते. आजच्या स्पर्धेच्या युगात हे मूल्य जपणे सर्वाधिक महत्त्वाचे ठरेल।हीच मनुष्य जीवनाची सार्थकता प्रणामसागरजी महाराज यांच्या सानिध्यात हिराकाका प्रांगण पासुन राजाबजार जैन मंदिर, भाजी बजार जैन मंदिर, सवाईवाला जैन मंदिर, सराफा जैन मंदिर या मार्गाने शोभायात्रा काढुन भगवंताला धुप चढविण्यात आली. यावेळी पुरुष व महिला पांढऱ्या व केशरी रंगाच्या साड्या तसेच भक्तांबर प्रभावनाची टोपी घालुन लक्ष वेधत होते. यावेळी नमोकार भक्ती मंडळाचे शैलेश पहाडे, राजकुमार पांडे, आदी सदस्यांनी धार्मिक गिते गाऊन उपस्थिताची मने जिंकली.

संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत विश्वस्थ मंडळ व चातुर्मास समितीने परिश्रम घेतले. पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी पंचायत सचिव प्रकाश अजमेरा, किरण पहाडे, महावीर ठोले, यतीन ठोले, ललीत पाटणी, अरुण पाटणी, संतोष सेठी, जितेंद्र पाटणी, निता ठोले, चंदा कासलीवाल, चातुर्मास कमिटी अध्यक्ष अनिल कासलीवाल, डॉ. प्रकाश पापडीवाल, प्रसाद पाटनी अप्पु पाटणी, गुरु परिवाराचे सुनिल सेठी, काजु कासलीवाल, सागर पाटणी, विजय चांदीवाल, निलेश सेठी, श्रेणीक कासलीवाल, सुरेखा पाटणी, शैलेश पहाडे, राजकुमार पांडे, कांताबाई पहाडे, प्रमोद पांडे, रवि सेठी, संजय पहाडे, विपीन पांडे, रमेश पाटणी, मंजु ठोले, महावीर सेठी, पारस गोधा, संगीता सेठी, जयश्री गंगवाल, कपील भैया, आशा कासलीवाल, वृषभ कासलीवाल, शोभा लोहाडे, श्रीपाल लोहाडे यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली आहे.

## गणेश विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगावी व प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे

**सध्याच्या** परिस्थितीत महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात अतिवृष्टीमुळे, ढगफुटीमुळे अनेक भाग जलमग्न झालेला आहे. यामुळे काही भागातील नदी-नाले, तलाव, विहिरी व समुद्र किनारा या सर्व तुडुंब भरलेल्या आहेत. गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे.त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. कारण गणपती विसर्जन करतांना नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत दुर्घटना होऊ शकते याला नाकारता येत नाही आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.मागील वर्षी २०२४ ला राज्यभरात गणेश विसर्जनाला गालबोट लागले व १५ जणांचा मृत्यू झाला.धुळ्यातील चितोड येथे ३ बालकांचा मृत्यू झाला, नाशिक येथील पाथर्डी फाटा परिसरात २ युवकांचा मृत्यू झाला, अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात ३ जण नदित वाहुन गेले, अहमदनगर जिल्ह्यात २ युवकांचा मृत्यू, जिंतूर तालुक्यात २ जणांचा मृत्यू, अकोला जिल्ह्यात एकाजणाचा मृत्यू.,त्यामुळे गणेश विसर्जन सावधगिरीने करावे.त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक परिवारावर मोठा आघात करू शकते. कारण खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढावून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच. परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण(स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवीलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सर्वानी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी.कारण आपण अनेकदा पाहिले व ऐकले सुध्दा आहे की मुर्ति विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत. या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे.त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.ज्या-ज्या ठीकाणी कृत्रीम तलाव (आर्टीफीशीयल टॅंक)ची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी,विहीर, समुद्र किनारा,किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या-त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात.अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे.कारण छोटीशी चुक मोठा आघात पोहचवु शकते याला नाकारता येत नाही आणि याचे दुःख संपूर्ण परिवाराला व मंडळाला भोगावे लागते. गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे 'निर्माल्य' तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केली आहे त्याठिकाणीच टाकावे.यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे.गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार.कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या! असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो.परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा. यामुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे.'गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या' जय श्री गणेशाय नमः!

**-रमेश कृष्णराव लांजेवार.**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवाडा' प्रभावीपणे राबवा-विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## नियोजनाबाबत विभागाचा आढावा



छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- जनतेच्या दैनंदिन अडचणींना वेगवान दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान व पारदर्शक होणे गरजेचे आहे. या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन (१७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती (२ ऑक्टोबर) या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवाडा' राबविला जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवाडा' प्रभावीपणे राबवा असे निर्देश आज विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात अभियानाचे नियोजन व प्रभावी अंमल बजावणीसाठी विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली. या बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी सहभागी झाले, तर बैठकस्थळी अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

**लोकप्रतिनिधी व जनसहभाग महत्त्वाचा**

अभियानात जनसहभाग व्हावा यासाठी स्थानिक खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्यांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. तसेच जिल्हाधिकारी यांनी या अभियानाला व्यापक प्रसिद्धी द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव**

अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारींकडून सन्मान करण्यात येईल, असेही श्री. पापळकर यांनी सांगितले.

**अभियानाचे तीन टप्पे**

पहिला टप्पा (१७ ते २२ सप्टेंबर) – पाणंद रस्ते मोहिम, पाणंद व शिवरस्त्यांना क्रमांक देणे, गाव नकाशांवर रस्ते चिन्हांकित करणे,नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे, शेतावर जाण्यासाठी संमतीपत्र घेणे, रस्ता अदालत आयोजित करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे.

दुसरा टप्पा (२३ ते २७ सप्टेंबर) – 'सर्वांसाठी घरे' शासकीय जमिनी लाभार्थ्यांना पट्टे वाटप करणे, अतिक्रमणे नियमबद्ध करून वैध करणे, विकास आराखड्याशी सुसंगत गायरान जमिनींचा उपयोग, खाजगी मिळकतधारकांना पट्टे वाटप करणे.

तिसरा टप्पा (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर) – नाविन्यपूर्ण उपक्रम, स्थानिक गरजा व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी स्वतः उपक्रम आखणार आहेत.

विभागातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी तहसीलदार उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी कृत्रिम वाळूचा वापर करण्याकरीता शासनाने ठरविलेल्या धोरणाबाबतही आढावा घेण्यात आला. नैसर्गिक वाळूसाठी कृत्रिम वाळू किंवा एम सँड ही सर्वात योग्य पर्यायी सामग्री म्हणून एम सँडला प्रोत्साहन देण्यासाठी धोरण निश्चित करण्यात आले आहे. याबाबतही विभागीय आयुक्त श्री.पापळकर यांनी आढावा घेतला.

# महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांना 'एनर्जी लीडरशिप अ‍ॅवॉर्ड'

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'तर्फे ऊर्जा क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नुकताच 'एनर्जी लीडरशिप अ‍ॅवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन चालू असून त्यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या कामामुळे हा सन्मान झाला आहे. महावितरणच्या कामगिरीत राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या पुरस्काराचे श्रेय महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आहे, असे लोकेश चंद्र यांनी सांगितले.

वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे प्रमुख पाब्लो स्टॅन्ले व अध्यक्ष हेन्री आर. यांच्या स्वाक्षरीने लोकेश चंद्र यांना पुरस्कारस्वरूप प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे.



प्रशस्तीपत्रात म्हटले आहे की, ऊर्जा क्षेत्रातील असामान्य नेतृत्व, प्रशासनातील दूरदृष्टी आणि महाराष्ट्राच्या वीजवितरण क्षेत्रातील असामान्य योगदानाबद्दल लोकेश चंद्र यांना एनर्जी लीडरशीप अ‍ॅवॉर्ड २०२५ प्रदान करण्यात येत आहे. कार्यक्षमता, कल्पकता आणि सेवेबद्दलच्या समर्पित वृत्तीमुळे लोकेश चंद्र यांनी अक्षय्य ऊर्जेच्या वापराला चालना देण्यासोबतच लाखो नागरिकांना भरवाशाचा वीज पुरवठा करण्यात प्रमुख भूमिका बजावली आहे.

अक्षय्य ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी बचत करून वीजदरात कपात करण्याची ऐतिहासिक कामगिरी महावितरणने केली आहे. अशा प्रकारे वीजदरात कपात करणारी महावितरण ही देशातील पहिलीच सार्वजनिक वीज वितरण कंपनी आहे. पुढील पाच वर्षात वीज खरेदीमध्ये अक्षय्य ऊर्जेवर भर दिल्यामुळे महावितरणची सुमारे ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने पाच वर्षे वीजदरात कपात शक्य झाली आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीत लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर ४५ लाख कृषी पंप चालविण्याची ही १६,००० मेगावॅट क्षमतेची गेम चेंजर योजना आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती योजनेमध्ये राज्यातील ग्राहकांनी नुकताच एक हजार मेगावॅटचा टप्पा ओलांडला. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी महावितरण करत आहे. शेतकऱ्यांना हक्काची सिंचन व्यवस्था मिळण्यासाठी शेतात सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात सर्वाधिक पंप बसविले आहेत.

# मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघातर्फे राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

नाशिक (प्रतिनिधी) - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या पाचवा वर्धापन दिन येत्या दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी आहे. त्या निमित्ताने या माजी विद्यार्थी संघाच्या वतीने राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा मुक्त विद्यापीठातून शिक्षण घेतलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांसाठी असून त्यासाठी कमाल शब्दमर्यादा एक हजार आहे. स्पर्धेसाठी निबंध पाठविण्याची अंतिम मुदत ही येत्या दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे.

निबंध लेखन स्पर्धेसाठीचे विषय हे १) मुक्त विद्यापीठामुळे शिक्षणाच्या खुल्या झालेल्या संधी २) मुक्त विद्यापीठातून घेतलेल्या शिक्षणाची माझ्या दैनंदिन जीवनातील उपयुक्तता ३) 'ज्ञानगंगा घरोघरी' नेणारे मुक्त विद्यापीठ ४) मुक्त विद्यापीठातून प्रौढांच्या शिक्षणाची स्वप्नपूर्ती ५) महिलांच्या सबलीकरणात मुक्त विद्यापीठाचे स्थान ६) मुक्त व दूरस्थ शिक्षणामधील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर (ए.आय) असे एकूण सहा आहेत. स्पर्धेसाठी केवळ मराठी भाषेतून लिहिलेले निबंधच स्वीकारले जातील. निबंधासोबत माजी विद्यार्थ्यांचे नाव, पूर्ण केलेला शिक्षणक्रम, वर्ष, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी यांचा उल्लेख व निबंधाच्या खाली विद्यार्थ्याची सही असणे बंधनकारक आहे. स्पर्धेसाठीचा निबंध हा 'मा. अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक, पिन – ४२२२२२ या पत्त्यावर बंद पाकिटातून टपालाने अथवा alumniycmou@ycmou.ac.in या ईमेल आयडीवर १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत.

या स्पर्धेतील विजेत्यांना विशेष समारंभात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक म्हणून अनुक्रमे रुपये ३०००/-, रुपये २०००/- व रुपये १०००/- आणि उत्तेजनार्थ २ पारितोषिके रुपये ५००/- प्रत्येकीसह सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येईल. तसेच माजी विद्यार्थी संघाच्या वतीने निवडक निबंधांचे ई-बुक प्रकाशित केले जाईल. निबंध लेखनासाठी वयाचे बंधन नाही. या स्पर्धेत राज्यातील जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र. कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या डॉ. संजीवनी महाले, कुल सचिव तथा अध्यक्ष दिलीप भरड व माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांनी केले आहे.

# महिला बचत गटाच्या माध्यमातून चार हजार चारशे वृक्ष लावण्याचा संकल्प

वैजापूर दि.३ (प्रतिनिधी)- वैजापूर येथील आकांक्षा महिला बचत गट, तुळजाभवानी महिला बचत गट,भाग्यलक्ष्मी महिला बचत गट,मोना महिला बचत गट, ओम साई महिला बचत गट,हुमेरा महिला बचत गट, या महिला बचत गटाच्या महिलांनी नगर पालिकेच्या खुल्या जागेवर ४४००रोपटी लावून हरित वैजापूर करण्याचा संकल्प केला आहे. याचाच भाग म्हणून बुधवार (ता.०३) रोजी लक्ष्मीनगर ,शिवशंकर वसाहतीत पालिकेच्या राखीव जागी सामाजिक कार्यकर्ते,स्वच्छतादूत व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत ५१ वृक्ष हुमेरा महिला बचत गटाच्या महिलांनी लावून ती जगविण्याचा संकल्प केला.मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत उत्तम बिघोत(राजपूत)यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुनील भाग्यवंत तसेच स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे व सहाय्यक रमेश त्रिभुवन यांच्या सहभागाने 'एक पेड माँ के नाम' या अंतर्गत शहराच्या विविध भागात साडे चार हजार वृक्ष पुढील दोन महिन्यात लावण्यात येणार आहे.

१५ ऑगस्ट ला आरंभ झालेल्या ह्या उपक्रमात आतापर्यंत ८०१ रोपटी विविध भागात लावण्यात आलेली आहेत.महिला बचत गटाच्या महिला या झाडांना पाणी ही टाकणार आहेत व संरक्षण, संवर्धन साठी जाळी ही लावणार आहेत,व दैनंदिन देखरेख करणार आहेत.

# औरंगाबाद शहर सुधार संघर्ष समिती संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांसाठी मैदानात

छत्रपती संभाजीनगर दि.३ (प्रतिनिधी)- संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना गेल्या वर्षभरापासून कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. त्यामुळे गरीब, गरजू व वयोवृद्ध नागरिकांच्या उपजीविकेवर मोठे संकट ओढवले आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी औरंगाबाद शहर सुधार संघर्ष समितीने निवेदन सादर केले.

जिल्हाधिकारी, आर. डी. सी. हे उपलब्ध नसल्याने समितीचे अध्यक्ष अशरफ पठाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा पुरवठा अधिकारी प्रविण फुलारी यांना निवेदन दिले. यावेळी उपाध्यक्ष शेख अमीर बाबा, अलीम बेग, शेख सलीम आदी मान्यवर उपस्थित होते.

शेख अमीर बाबा यांनी यावेळी सांगितले की, 'गेल्या एक वर्षापासून लाभार्थ्यांना आर्थिक मदत मिळालेली नाही. एकही मीटिंग झालेली नाही. प्रशासनाच्या निष्क्रीय भूमिकेमुळे गरीब नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे,' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. अशरफ पठाण यांनी सांगितले आहे की, लाभार्थ्यांचे जीवनमान या योजनांवर अवलंबून आहे. मात्र निधी वितरणात झालेल्या विलंबामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. लाभार्थी जेव्हा संबंधित अधिकाऱ्यांना भेटतात तेव्हा 'मीटिंग झालेली नाही', 'फंड आलेला नाही' अशी उत्तरे देऊन त्यांना परतवण्यात येते. अलीम बेग यांनी सांगितले आहे की, लाभार्थ्यांना लवकरात लवकर त्यांना मानधन मिळाले नाही तर आम्ही लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठे आंदोलन उभे करू असे म्हटले आहे.

(पान १ वरुन)

## मी मराठा आरक्षण...

का? त्याची विनंती मी १३ तारखेला न्यायालयात करणार आहे, असेही गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटलं. तसेच, आईस गोळा देऊन मनोज जरांगे यांना पाठवलं आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री काल तिथे आंदोलनस्थळी नव्हते, मग मागासवर्गीय मंत्री फक्त नामधारी असतात का? महिलामंत्र्यांना आंदोलन स्थळी नेण्यात नाही आले, हे राधाकृष्ण विखे पाटील यांनी का केलं नाही? असा सवालही सदावर्तेंनी उपस्थित केला आहे.

## मुंबईत झालेल्या नुकसान...

खंडन केले. त्याची दखल घेऊन तोंडी माहिती देऊ नका, तर प्रतिज्ञापत्राद्वारे भूमिका स्पष्ट करा, असे आदेश न्यायालयाने दिले.

तसेच, विषय मार्गी लागला असल्याने याचिका प्रलंबित ठेवण्यात अर्थ नाही. परंतु, आम्हाला काहीही तोंडी नको आहे. त्यामुळे, जरागे आणि आदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्रावर बाजू मांडावी. त्यानंतर याचिका निकाली काढली जाईल, असे स्पष्ट करून न्यायालयाने हे प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी जरांगे आणि आयोकांना चार आठवड्यांची मुदत दिली.

## चंद्रपूरमध्ये मतदार यादीत...

पुरावे दिले होते. तेव्हापासून मत चोरी मुद्द्यावरून काँग्रेस आक्रमक झाली आहे. मागील महिन्यात विरोधी पक्षांच्या खासदारांनी निवडणूक आयोगावर मोर्चा देखील काढला होता. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मतदार हक्क यात्रा काढली होती. बिहारमध्ये १७ ऑगस्टपासून सुरू झालेली ही यात्रा सुमारे २५ जिल्ह्यांमधून १३०० किमीचा प्रवास करून पाटणा येथे संपली. राहुल गांधींच्या यात्रेनंतर आता महाराष्ट्र काँग्रेसच्या वतीने 'वोट चोर, गद्दी छोड' या मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे.

## मराठा समाजाने लढाई...

महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना या आनंदाचे, या काढलेल्या तिन्ही जीआरचे मी समाजाला क्रेडीट देतो. सर्व यश समाजाचे आहे. ते त्यांनीच मिळवले. मी केवळ नाममात्र आहे.

जरांगे म्हणाले, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाने माझ्या शब्दावर विश्वास ठेवला. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा सगळे मराठवाडा सगळे मराठे आरक्षणात जाणार म्हणजे जाणार यात तिळमात्र शंका नाही. कुणी ही शंका ठेवायचीही नाही. ज्यांच्या नोंदी नाहीत म्हणून गॅझेटियर काढायचे. त्याचा जीआर निघणे खूप आवश्यक होते. १८८१ पासून हा जीआर काढण्यात आला नव्हता. एक साधी ओळखही सरकारने मराठ्यांच्या हिताची लिहिली नव्हती. स्वातंत्र्य मिळून ७५-७६ वर्षे झाली. पण मराठ्यांच्या हक्काचे गॅझेटियर होते. पण त्यानंतरही सरकारने सरकारने एक ओळही मराठ्यांच्या हिताची दिली नव्हती.

## संजय गांधी निराधार, दिव्यांग...

बसेल. या बदलामुळे रोजगार निर्मितीस प्रोत्साहन, कामगार हक्कांचे संरक्षण होणार आहे. कामाच्या वेळेबाबत इतर राज्यातील तरतुदीप्रमाणे तरतूद केल्याने नवीन गुंतवणूक आकर्षित होण्यास मदत होईल. अतिकालिक कामाचा कालावधी वाढविल्यामुळे कामगारांनाही मोबदला वेतनाच्या दुप्पट दराने मिळेल.

कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ मध्ये सुधारणा केल्यामुळे कारखान्यातील दैनंदिन कामाच्या तासांची मर्यादा ९ तासांवरून १२ तासांपर्यंत होणार आहे. कलम ५५ मधील सुधारणांमुळे कारखान्यातील विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे याऐवजी ६ तासापर्यंत ३० मिनिटे असा करण्यात आला आहे. कलम ५६ मध्ये सुधारणा करुन आठवड्याच्या कामाचा कार्याचा विस्तार कालावधी साडेदहा तासावरुन १२ तास करण्यात आला आहे. कलम ६५ मधील सुधारणांमुळे अतिकालिक कामाच्या तासाची मर्यादा ११५ तास प्रति तिमाही यावरुन १४४ तास प्रति तिमाही अशी करण्यात येणार आहे. अर्थात अतिकालिक कामासाठी कामगारांची लेखी संमती घेणे आवश्यक असेल, अशी कठोर तरतूद सुद्धा त्यात आहे.


CIDCO WE MAKE CITIES

(CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION MAHARASHTRA LTD)

**NOTICE INVITING BID**

CIDCO of Maharashtra Limited through the process of e-tendering invites "ONLINE" Item Rate Percentage bid from the Original Equipment Manufacturers (OEM) fulfilling the mandatory eligibility criteria and who have completed work of similar nature like providing supplying & installing File Compactors (fire retarding optimizer) in any Govt./Semi. Govt. Organization, PSU's or Private Sectors for the work mentioned below:

| Sr. No. | Description | Details |
|---|---|---|
| 1 | Name of Work | Providing, Supplying and Installing Storage Cabinets at CIDCO Chatrapati Sambhajinagar and Waluj Office. |
| 2 | C.A. No. | 01/CIDCO/SE(HSG-I & NT)/ EE(AUR-I)/2025-26 |
| 3 | Cost put to the Bid | Rs.79,56,958.80 |
| 4 | E.M.D. | Rs. 80,000/- |
| 5 | Completion Period | 60 (Sixty) Days (including monsoon) |
| 6 | Tender Processing Fee | Rs.5,900.00 (including 18% GST (Non-Refundable)) |

Bid Document along with Bidding Programme will be available on the website mahatenders.gov.in from 08/09/2025 at 17.01 Hrs.

Sd/-
Superintending Engineer (HSG-I & NT)
CIDCO Limited.

PR/117/993



Truhome FINANCE

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **दूरध्वनी:** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www. truhomefinance.in

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा भौतिक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि १४.१०.२०२५ सकाळी ११:०० ते दु १२:००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१) श्री. गोपाल प्रकाश बसैये (कर्जदार)<br>२) श्रीमती रीना गोपाल बसैये (सह-कर्जदार १)<br>३) श्री. सागर गोपाल बसैये (सह-कर्जदार २)<br>सर्वांचे निवासस्थान पत्ता: फ्लॅट क्रमांक १७ इमारत क्रमांक ०३ कुवारफल्ली राजाबाजार, राजाबाजार जवळ, गणपती मंदिर,औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१ तसेच येथे- गल्ली नं. ५, घर नं ई२२, भवानी नगर, जुना मोंढाऔरंगाबाद, महाराष्ट्र- ४३१००१<br>तसेच येथे- फ्लॅट क्रमांक १७, चौथा मजला, साजेद राजभवन इमारत क्र ३, क्रमांक ५२, एमयू एन ३-१३-३७,सीटीएस क्रमांक ८५८८, कुवारफल्ली राजा बाजार ,जि. औरंगाबाद-४३१००१**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार** **२०/०८/२०२५ भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना दिनांक: १०/०२/२०२५<br>दिनांक ०७/०२/२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SHLHAURD0000667. अंतर्गत रु.२५,०९,०७१/- (पंचवीस लाख नऊ हजार एकहत्तर रुपये फक्त) सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार दराने पुढील व्याजासह. | रु.२९,२४,०००/- (रुपये एकोणतीस लाख चोवीस हजार फक्त)<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. २,९२,४००/- (रुपये दोन लाख बाणव हजार चारशे फक्त)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख: १३ ऑक्टोबर २०२५ वेळ स १०.०० ते सायं ०५.०० वा.** | **१४-ऑक्टोबर-२०२५<br>वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० पर्यंत.** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७. सुनील मानेकर ८९९९३४४८९७ अक्षय गुप्ता ८९८३५५२७३७ अजय झांझोत ९८२३३९०९९० निरीक्षण तारीख: २६.०९.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

सर्व तुकडा आणि फ्लॅट क्रमांक १७, चौथा मजला, ६८ चौ. मीटरचा पार्सल, साजेद राजभवन इमारत क्रमांक ३, पत्रक क्रमांक ५२, एमयू एन ३-१३-३७, सीटीएस क्रमांक ८५८८, कुवारफल्ली राजा बाजार, जिल्हा औरंगाबाद सीमा खालीलप्रमाणे: पूर्व - इमारत क्रमांक २, पश्चिम - फ्लॅट क्रमांक १६, लिफ्ट, आणि जिनादक्षिण - फ्लॅट क्रमांक १८, उत्तर - आकाशात उघडा

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- अ‍ॅक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ०००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण -औरंगाबाद
दिनांक - ०४-०९-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )